**फौजदारी प्रकिंया संहितेचे कलम २९९ प्रमाणे साक्षीदाराची साक्ष**

**नि.फौ.ख.क्र.७४/२०१७**
**सरकार वि. विनोद**
**निशाणी क्र.०७**

**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक २ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – श्रीकांत रामभाऊ ठवकर

वय – ४७ वर्ष, व्यवसाय – व्यवसाय

राहणार – कळमना, नागपूर

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. एम.एम.पंचारीया यांच्यातर्फे**

घटना दिनांक १९ जानेवारी २०१७ रोजी सायंकाळी ७.३० ते ८.०० वाजताच्या दरम्यान माझ्या घरासमोर घडली होती. त्यादिवशी आरोपीने माझी पत्नी भावना हिला शिवीगाळ करून हात ओढून मारहाण केली. त्यावेळी तो दारू पिलेला होता. त्यावेळी माझे वडील रामभाऊ माझे पत्नीला वाचविण्यासाठी आले असता आरोपीने त्यांना सुध्दा मारहाण केली. त्यानंतर मी तेथे गेलो असता मला आरोपीने ढकलले त्यामुळे मी खाली पडलो व माझ्या डावा पाय फ्रॅक्चर झाला होता. त्यानंतर माझे पत्नीने आरोपीविरुध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. त्यानंतर पोलीसांनी मला उपचारासाठी शासकीय रुग्णालय कन्हान येथे नेले. पोलीसांनी माझे बयान घेतले होते. आरोपी सध्या कुठे राहतो याची मला कल्पना नाही. घटनेला बराच कालावधी झाल्यामुळे मला प्रस्तुतची केस पुढे चालवायची नाही.

**सरतपास संपला.**

**प्रस्तुतच्या खटल्यात आरोपी फरारी असल्यामुळे आरोपीच्या अनुपस्थितीत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे साक्ष नोंदविण्यात आलेली आहे. त्यामुळे, आरोपीतर्फे उलटतपास नाही.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

RAJESH RAMESHRAO SHEREKAR

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2026.04.20 13:49:01 +0530

कामठी
दिनांक २०.०४.२०२६

(रा.र. शेरेकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कोर्ट नं.२, कामठी.